

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(श्रेणीबद्ध स्वायत्ततप्राप्त विद्यापीठ)

## शैक्षणिक वर्ष २०२४-२५

## प्रवेश माहितीपुस्तिका



# एम. ए.
## (दूरस्थ अध्ययन माध्यम)

लेखन व संपादन

शिक्षणक्रम समन्वयक
मुक्त व दूरस्थ अध्ययन प्रशाळा

संचालक
मुक्त व दूरस्थ अध्ययन प्रशाळा

**ऑनलाईन प्रवेशासाठी**

http://unipune.ac.in/SOL/

**प्रवेश प्रक्रियेसाठी संपर्क**

student.sol@unipune.ac.in

# शैक्षणिक वर्ष २०२४-२५

# शैक्षणिक सत्र सप्टेंबर-ऑक्टोबर २०२४

# प्रवेश माहितीपुस्तिका

- प्रस्तावना
- दूरस्थ शिक्षण पद्धती
- उपलब्ध अभ्यासक्रम
- प्रवेश पात्रता
- प्रवेश शुल्क
- प्रवेश प्रक्रिया
- प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे
- पाठ्यक्रम, अभ्यास साहित्य व प्राध्यापकांचे मार्गदर्शन
- परीक्षा पद्धती
- विद्यार्थ्यांसाठी महत्वाच्या सूचना
- अभ्यासक्रम – श्रेयांक आराखडा

## प्रस्तावना

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठास विद्यापीठ अनुदान आयोगाकडून 'प्रवर्ग-१' दर्जा बहाल करण्यात आला असून विद्यापीठाने 'श्रेणीबद्ध स्वायत्तता' प्राप्त केलेली आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार उच्च शिक्षण देशातील अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ नियमित शिक्षणपद्धतीसोबतच 'दूरस्थ' शिक्षणपद्धती उपलब्ध करून देत आहे.

विद्यापीठाच्या 'मुक्त व दूरस्थ अध्ययन प्रशाळा' या विभागामार्फत विविध अभ्यासक्रम दूरस्थ अध्ययन पद्धतीने उपलब्ध करून देण्यात आले आहेत. नियमितपणे महाविद्यालयीन शिक्षण घेणे शक्य न होणाऱ्या वर्गासाठी (विशेषतः नोकरदार वर्ग, गृहिणी, जेष्ठ नागरिक, दुर्गम भागातील नागरिक, व्यवसायिक इ.) उच्च शिक्षणाची दालने खुली झालेली आहेत.

## ‘दूरस्थ’ शिक्षण पद्धती:

नियमितपणे महाविद्यालयामध्ये उपस्थित राहणे शक्य न होणाऱ्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेणे हे 'दूरस्थ अध्ययन' पद्धतीमुळे सुलभ झालेले आहे. 'दूरस्थ अध्ययन' पद्धतीने प्राप्त पदवी ही नियमित महाविद्यालयांमध्ये जाऊन प्राप्त केलेल्या पदवीस समकक्ष असल्याचे विद्यापीठ अनुदान आयोग (UGC), नवी दिल्ली यांचेद्वारे जाहीर करण्यात आले आहे.

दूरस्थ शिक्षण पद्धतीमध्ये विद्यार्थ्यास प्रवेशासाठी एक अभ्यास केंद्र (महाविद्यालय) निवडून अभ्यास केंद्रावर प्रवेश अर्ज जमा करणे आवश्यक असते. सदर अभ्यास केंद्रामधून विद्यार्थ्यास पाठ्यक्रमानुसार लिहिलेले अभ्यास साहित्य (पुस्तके) उपलब्ध होतात. तसेच प्राध्यापकांचे मार्गदर्शदेखील उपलब्ध होते. विद्यार्थ्याची परीक्षा ही अभ्यास केंद्रामध्ये/महाविद्यालयामध्ये घेण्यात येते.

## उपलब्ध अभ्यासक्रम:

दूरस्थ अध्ययन पद्धतीने पदव्युत्तर पदवी स्तरावर एम.ए. शिक्षणक्रम मराठी तसेच इंग्लिश माध्यमातून उपलब्ध असून त्यामध्ये विशेष स्तरावर पुढील अभ्यासक्रम उपलब्ध आहेत:

मराठी, हिंदी, संस्कृत, इंग्रजी, इतिहास, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, तत्वज्ञान, शिक्षणशास्त्र आणि मानसशास्त्र.

## प्रवेशपात्रता:

मान्यताप्राप्त विद्यापीठातून किमान ३ वर्ष कालावधीची पदवी (Bachelor Degree) परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थी प्रथम वर्ष एम.ए. प्रवेशास पात्र आहेत.

## प्रवेश शुल्क:

एम.ए. या शिक्षणक्रमाच्या प्रथम वर्षाचे शुल्क महाराष्ट्रातील विद्यापीठांच्या विद्यार्थ्यांकरिता रु. ८३००/- व महाराष्ट्राबाहेरील विद्यापीठांच्या विद्यार्थ्यांकरिता रु. ९१२०/- इतके असून सदर शुल्क हे प्रवेश घेतेवेळी ऑनलाईन पद्धतीने भरायचे आहे. सदर शुल्कामध्ये नोंदणी शुल्क, शिकवणी शुल्क, पात्रता शुल्क, अभ्यास-साहित्य शुल्क, अभ्यासकेंद्र शुल्क व नियमित परीक्षा शुल्क यांचा समावेश असल्याने प्रवेशावेळी ऑनलाईन पद्धतीने प्रवेश शुल्क भरल्यानंतर इतर कोणतेही शुल्क भरण्याची आवश्यकता नाही.

# प्रवेशप्रक्रिया

## ऑनलाईन प्रवेशप्रक्रिया:

विद्यार्थ्यास प्रथमत: विद्यापीठाच्या http://unipune.ac.in/SOL/admission2024.html या संकेतस्थळावर ऑनलाईन नावनोंदणी करावयाची आहे. त्यानंतर प्रवेश अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरावयाचा आहे.

दूरस्थ अध्ययन पद्धतीमध्ये प्रवेश घेतेवेळी विद्यार्थ्यास एक अभ्यासकेंद्र निवडायचे आहे. विद्यापीठाने पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांमध्ये 'दूरशिक्षण' अभ्यासकेंद्रे उपलब्ध करून दिलेली आहेत. ऑनलाईन प्रवेश अर्जामध्ये अभ्यासकेंद्रांची यादी उपलब्ध आहे. प्रवेशअर्ज भरतेवेळी विद्यार्थ्यास अभ्यासकेंद्रांच्या यादीमधून त्याच्या सोयीचे कोणतेही एक अभ्यासकेंद्र निवडता येईल.

त्यानंतर विद्यार्थ्यास अध्ययनाचे माध्यम व विषय निवडून प्रवेश शुल्क ऑनलाईन पद्धतीने भरावयाचे आहे.

शुल्क भरल्यानंतर विद्यार्थ्याने प्रवेश अर्ज (PDF File) डाउनलोड करून घ्यायचा आहे आणि त्याची छापील प्रत (print) काढून घ्यायची आहे. ऑनलाईन प्रवेश अर्ज भरतेवेळी कोणतीही कागदपत्रे स्कॅन करून अपलोड करण्याची आवश्यकता नाही.

## अभ्यासकेंद्रावरील प्रवेश प्रक्रिया:

विद्यार्थ्याने त्याच्या प्रवेश अर्जाची छापील प्रत आवश्यक त्या कागदपत्रांसह त्याने निवडलेल्या अभ्यासकेंद्रावर जमा करायची आहे. अभ्यासकेंद्रावर आवश्यक त्या कागदपत्रांसह प्रवेश अर्ज जमा केल्यानंतरच प्रवेश निश्चित होईल. तरी, विहित मुदतीमध्ये अभ्यासकेंद्रावर प्रवेश अर्ज जमा करणे आवश्यक आहे. विहित मुदतीमध्ये अभ्यासकेंद्रावर प्रवेश अर्ज जमा न केल्यास प्रवेश अर्ज रद्द होईल आणि प्रवेश होणार नाही.

## प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे:

ऑनलाईन प्रवेश अर्ज भरतेवेळी कोणतीही कागदपत्रे स्कॅन करून अपलोड करण्याची आवश्यकता नाही. परंतु, ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर अभ्यासकेंद्रावर प्रवेश अर्ज जमा करतेवेळी पुढील कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे:

१) प्रवेश अर्ज (अभ्यासकेंद्र प्रत)

२) प्रवेश अर्ज (विद्यार्थी प्रत)

३) आधारकार्ड (मूळ व झेरॉक्स प्रत)

४) पदवी परीक्षेचे गुणपत्रक (मूळ व झेरॉक्स प्रत)

५) माध्यमिक शिक्षण (इयत्ता १०वीचे) प्रमाणपत्र (मूळ व झेरॉक्स प्रत)

६) विद्यार्थ्याच्या नावामध्ये बदल झालेला असल्यास त्याबाबतचा पुरावा (मूळ व झेरॉक्स प्रत)

७) पुढीलपैकी <u>एक</u> कागदपत्र (जे लागू असेल ते) (मूळ प्रत):

i) याआधीचा प्रवेश सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयात अथवा विद्यापीठ विभागात घेतला असेल तर, संबंधित विभागाचे स्थानांतर प्रमाणपत्र (Transfer Certificate) आवश्यक आहे.
याआधीचा प्रवेश सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या बहिःस्थ विभागात घेतला असेल तर, बहिःस्थ विभागाचे स्थानांतर प्रमाणपत्र (Transfer Certificate) आवश्यक आहे. याआधीचा प्रवेश सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मुक्त व दूरस्थ अध्ययन प्रशाळा' या विभागामध्ये घेतला असेल तर स्थानांतर प्रमाणपत्र (Transfer Certificate) आवश्यक नाही.

ii) याआधीचा प्रवेश सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाव्यतिरिक्त इतर कोणत्याही विद्यापीठामध्ये किंवा इतर विद्यापीठ संलग्न महाविद्यालयामध्ये घेतला असेल तर संबंधित विद्यापीठाचे स्थलांतर प्रमाणपत्र (Migration Certificate) आवश्यक आहे.

- अभ्यास केंद्रावर प्रवेश अर्ज जमा करतेवेळी विद्यार्थ्याकडे स्थानांतर / स्थलांतर प्रमाणपत्र (T.C. Migration Certificate) नसेल तर विद्यार्थ्याने प्रवेश अर्जासोबत विहित नमुन्यातील हमीपत्र देणे आवश्यक आहे. सदर

प्रमाणपत्र अभ्यास केंद्रावर जमा केल्यानंतरच विद्यार्थ्यांचा प्रवेश निश्चित होईल.

- अभ्यास केंद्रावर प्रवेश अर्ज जमा करण्यापूर्वी विद्यार्थ्याने प्रवेश अर्जातील वैयक्तिक तपशील (नाव, मोबाईल क्रमांक, इ-मेलआयडी, पत्ता, जन्म दिनांक इ.) काळजीपूर्वक तपासून पाहणे आवश्यक आहे. यामध्ये काही दुरुस्ती करावयाची असल्यास विहित नमुन्यातील अर्ज प्रवेश अर्जासोबत अभ्यासकेंद्रावर जमा करणे आवश्यक आहे.
- प्रवेश अर्ज (छापील प्रत) तसेच आवश्यक कागदपत्रे मुदतीत जमा न केल्यास प्रवेश निश्चित होणार नाही, याची प्रथम वर्षाच्या सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

## पाठ्यक्रम, अभ्यास साहित्य व प्राध्यापकांचे मार्गदर्शन

दूरस्थ अध्ययन पद्धतीच्या विविध शिक्षणक्रमांकरिता पाठ्यक्रम प्रशाळेच्या http://unipune.ac.in/SOL/ या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला आहे. सदर पाठ्यक्रम सर्व अभ्यासकेंद्रांवर लागू असेल. पाठ्यक्रमानुसार लिहिलेले अभ्यास साहित्य हे छापील स्वरूपात उपलब्ध आहे. सर्व प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यास त्याने निवडलेल्या अभ्यासकेंद्रातून अभ्यास साहित्य (पुस्तके) उपलब्ध होतील.

प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यांनंतर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी प्रथमत: "उद्बोधन वर्ग" आयोजित केला जातो. विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आलेल्या पुस्तकांचा उपयोग करून 'स्वयं-अध्ययन' कसे करावे याबाबत मार्गदर्शन केले जाते. अभ्यासकेंद्रामार्फत प्रत्येक विषयासाठी मार्गदर्शनपर संमंत्रण सत्रे ही रविवारी अथवा सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी आयोजित केली जातात. सदर सत्रांमध्ये विद्यार्थ्यांना येणाऱ्या संबंधित विषयाच्या अडचणी / शंका यांचे निरसन शिक्षकांमार्फत करण्यात येते. तरी, विद्यार्थ्यांनी सदर सत्रांमध्ये सक्रियपणे सहभागी होणे त्यांच्या हिताचे आहे. तसेच सदर सत्रांदरम्यान अंतर्गत मूल्यमापनाबाबत देखील सूचना देण्यात येते.

## परीक्षा पद्धती:

प्रत्येक विषयासाठी अंतर्गत व सत्रांत परीक्षा घेण्यात येते. अंतर्गत व सत्रांत परीक्षेतील गुणांचे प्रमाण ३०:७० असे असते. अंतर्गत परीक्षा ही अभ्यासकेंद्रामार्फत घेण्यात येते. याबाबतचा तपशील अभ्यासकेंद्रामार्फत विद्यार्थ्यांना वेळोवेळी देण्यात येतो.

सत्रांत परीक्षा ही लेखी स्वरूपाची परीक्षा विद्यापीठाच्या परीक्षा विभागामार्फत साधारणत: डिसेंबर-जानेवारी व जून महिन्यामध्ये आयोजित करण्यात येते. सदर परीक्षा पुणे, पिंपरी-चिंचवड, माळेगाव बु. (बारामती), अहमदनगर, नाशिक, रावळगाव,

सिल्वासा या केंद्रांवर आयोजितकरण्यात येते. विद्यार्थी संख्येनुसार इतर ठिकाणी देखील परीक्षा आयोजित केली जाऊ शकते. सदर परीक्षेचे वेळापत्रक व प्रश्नपत्रिकेचा आराखडा इ. बाबतची माहिती प्रशाळेच्या संकेतस्थळावर वेळोवेळी देण्यात येते.

उत्तीर्ण होण्यासाठी प्रत्येक विषयामध्ये अंतर्गत परीक्षा आणि सत्रांत परीक्षा अशा दोन्ही परीक्षेत स्वतंत्ररित्या किमान ४० % गुण मिळविणे आवश्यक आहे. कोणत्याही विषयात उत्तीर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यास त्या विषयाचे श्रेयांक मिळतील. प्रथम वर्षाच्या एकूण श्रेयांकांपैकी किमान ५० % श्रेयांक मिळाल्यास विद्यार्थी द्वितीय वर्ष प्रवेशास पात्र असेल.

एम.ए. या शिक्षणक्रमास प्रवेश घेतल्यापासून जास्तीत जास्त ४ वर्षांमध्ये अभ्यासक्रम पूर्ण करता येईल. (एकूण ४ वर्ष कालावधीमध्ये सर्व विषय उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.) त्यानंतर विद्यार्थ्यांचा नोंदणी कालावधी समाप्त होत असल्याने विद्यार्थ्यास परीक्षा देता येत नाही.

## विद्यार्थ्यांसाठी महत्वाच्या सूचना:

१) ऑनलाईन प्रवेश अर्ज भरण्याबाबत मार्गदर्शनपर सूचना व व्हिडियो प्रवेश अर्जासाठीच्या संकेतस्थळावर दिलेले आहेत.

२) ऑनलाईन नावनोंदणी व प्रवेश अर्ज भरतेवेळी विद्यार्थ्यांनी दिलेल्या मोबाईल क्रमांकावर विद्यापीठाकडून व महाविद्यालयाकडून संदेश (message) येत असल्याने विद्यार्थ्याने स्वतःचा मोबाईल क्रमांकवर ई-मेल आयडी वापरावा.

३) ऑनलाईन नाव नोंदणी करतेवेळी मोबाईलवर मिळालेल्या संदेशामधील UserID जपून ठेवावा. सदर UserIDचा वापर पुढे विद्यार्थ्यास त्याच्या प्रोफाइलला लॉगिन करण्यासाठी, नोंदणीक्रमांक (PRN) मिळविण्यासाठी तसेच परीक्षा प्रवेशपत्र मिळविण्यासाठी होत असल्याने, सदर UserID जपून ठेवणे अत्यंत आवश्यक आहे.

४) प्रवेश प्रक्रियेबाबत मदतीसाठी विद्यार्थ्यांना student.sol@unipune.ac.in या इ-मेल आयडीवर प्रशाळेशी संपर्क करता येईल. इ-मेलमध्ये विद्यार्थ्याने स्वतःचे नाव, मोबाईल

क्रमांक, अभ्यासक्रमाचे नाव, अभ्यासकेंद्राचे नाव, अर्जक्रमांक (अर्ज पूर्ण भरला असल्यास) इ. तपशील नमूद करावा.

५) ऑनलाईन प्रवेश शुल्क भरतेवेळी बँक अकाउंटमधून पैसे वजा झाले असतील (transaction successful) आणि प्रवेशअर्ज (PDF) डाउनलोड होत नसेल तर पुन्हा शुल्क भरू नये (Double Payment करू नये) आणि प्रशाळेच्या student.sol@unipune.ac.in या इ-मेल आयडीवर त्वरित पुढील तपशील पाठविण्यात यावा:

बँकेचे नाव, transaction ID आणि पेमेंट पद्धती- कार्ड / UPI / नेटबँकिंग

६) प्रवेश सूचनेमध्ये दिलेल्या विहित मुदतीमध्ये अभ्यासकेंद्रावर आवश्यक त्या कागदपत्रांसह प्रवेश अर्ज जमा न केल्यास प्रवेश अर्ज रद्द होईल आणि प्रवेश होणार नाही, याची नोंद घ्यावी.

८) ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यावर प्रवेश अर्ज २ प्रतींमध्ये डाउनलोड होतो. त्यातील अभ्यासकेंद्र प्रत ही महाविद्यालयामध्ये जमा करावी आणि विद्यार्थी प्रतीवर अभ्यासकेंद्राचा शिक्का घेऊन ती प्रत आपला अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत जपून ठेवावी.

९) ऑनलाईन प्रवेश अर्ज भरतेवेळी विषय व अध्ययनाचे माध्यम काळजीपूर्वक निवडावे. निवडलेले विषय / माध्यम यामध्ये बदल करावयाचा असेल तर नियमानुसार शुल्क आकारण्यात येईल.

१०) प्रवेशप्रक्रिया, परीक्षा, निकाल इत्यादीबाबतच्या वेळोवेळी दिल्या जाणाऱ्या सूचनांसाठी विद्यार्थ्यांने http://unipune.ac.in/sol/ या संकेतस्थळास नियमितपणे भेट देणे आवश्यक आहे.

११) अंतर्गत परीक्षा ही अभ्यासकेंद्रामार्फत घेतली जात असल्याने विद्यार्थ्यांनी नियमितपणे अभ्यासकेंद्रांच्या संपर्कात राहून केंद्रामार्फत वेळोवेळी दिल्या जाणाऱ्या सूचनांनुसार अंतर्गत परीक्षा विहित मुदतीमध्ये देणे आवश्यक आहे.

१२) अनुशेषित परीक्षा अर्ज भरणे, पुढील वर्षांमध्ये प्रवेश घेण्यासाठी प्रवेश अर्ज भरणे याबाबतच्या सूचना http://unipune.ac.in/sol/ या संकेतस्थळावर देण्यात येतात. सदर अर्ज भरण्यासाठी ठराविक मुदत असते. सबब, विद्यार्थ्यांनी प्रशाळेच्या संकेतस्थळास नियमितपणे भेट देऊन विहित मुदतीत ऑनलाईन अर्ज भरणे आवश्यक आहे.

१३) प्रवेश प्रक्रियेदरम्यान काही मदत हवी असल्यास विद्यार्थ्यांनी student.sol@unipune.ac.in या इ-मेल आयडीवर संपर्क करावा. तसेच विद्यार्थ्यांना अभ्यास केंद्रावरदेखील प्रवेश प्रक्रियेबाबत मार्गदर्शन उपलब्ध होईल.

## अभ्यासक्रम – श्रेयांक आराखडा: प्रथम वर्ष एम.ए. (Master of Arts):

**Marathi**

| Subject & Code | Title of the Paper | Credit | Subject & Code | Title of the Paper | Credit |
|---|---|---|---|---|---|
| **SEMESTER - I** | | | **SEMESTER - II** | | |
| MAR 111-I | भाषाव्यवहार आणि भाषिक कौशल्ये - भाग १ | 4 | MAR 111-II | भाषाव्यवहार आणि भाषिक कौशल्ये - भाग २ | 4 |
| MAR 112-I | अर्वाचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास (इ.स.१८१८ ते इ.स. १९२०) | 4 | MAR 112-II | अर्वाचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास (इ.स.१९२१ ते इ.स. २०१०) | 4 |
| MAR 113-I | ऐतिहासिक भाषाविज्ञान | 4 | MAR 113-II | समाजभाषाविज्ञान | 4 |
| MAR 118-I | मराठी व्याकरण - भाग १ | 4 | MAR 118-II | मराठी व्याकरण - भाग २ | 4 |

**English**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| MA_ENG_01-I | English Literature from 1550 to 1798 Part-I | 4 | MA_ENG_01-II | English Literature from 1550 to 1798 Part-II | 4 |
| MA_ENG_02-I | English Literature from 1798 to the Present Part-I | 4 | MA_ENG_02-II | English Literature from 1798 to the Present Part-II | 4 |
| MA_ENG_03-I | Contemporary Studies in English Language Part-I | 4 | MA_ENG_03-II | Contemporary Studies in English Language Part-II | 4 |
| MA_ENG_04-I | Literary Criticism and Theory Part-I | 4 | MA_ENG_04-II | Literary Criticism and Theory Part-II | 4 |

**Hindi**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| HIN 111-I | मध्ययुगीन काव्य | 4 | HIN 111-II | कथेतर गद्य साहित्य | 4 |
| HIN 112-I | कथासाहित्य | 4 | HIN 112-II | शोध प्रविधि | 4 |
| HIN 113-I | भारतीय काव्यशास्त्र | 4 | HIN 113-II | पाश्चात्य काव्यशास्त्र | 4 |
| HIN 115-I | नाटककार मोहन राकेश | 4 | HIN 115-II | हिंदी उपन्यास साहित्य | 4 |

**Sanskrit**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| MASK01-I | वैदिक सुक्ते | 4 | MASK01-II | ब्राह्मणग्रंथ - उपनिषदे आणि निरुक्तम् | 4 |
| MASK02-I | वाल्मिकीरामायणम् (युद्धकांड सर्ग-९९ ते सर्ग १२८) | 4 | MASK02-II | शुकनासोपदेश: | 4 |
| MASK03-I | साहित्यम् - कर्णभारम् आणि चारुदत्तम् | 4 | MASK03-II | साहित्य - कुमारसम्भवम् | 4 |
| MASK04-I | सिद्धान्तकौमुदी | 4 | MASK04-II | भाषाशास्त्रम् | 4 |

**SEMESTER - I** | **SEMESTER - II**

**Economics**

| Subject & Code | Title of the Paper | Credit | Subject & Code | Title of the Paper | Credit |
|---|---|---|---|---|---|
| EC1001-I | Micro Economic Analysis - I | 4 | EC1001-II | Micro Economic Analysis - II | 4 |
| EC1002-I | Public Economics - I | 4 | EC1002-II | Public Economics - II | 4 |
| EC1003-I | International Trade | 4 | EC1003-II | International Finance | 4 |
| EC1005-I | Rural Economics | 4 | EC1005-II | Urban Economics | 4 |

**Political Science**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| PS111-I | Traditions of Political Thought | 4 | PS111-II | Comparative Political Analysis | 4 |
| PS112-I | Administrative Theory | 4 | PS112-II | Theory of International Politics | 4 |
| PS113-I | Political Institutions in India | 4 | PS113-II | Public Policy | 4 |
| PS115-I | Political Process in Maharashtra | 4 | PS115-II | Human Rights | 4 |

**History**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| HIS111-I | History: Theory and Method | 4 | HIIS111-II | Approaches to History | 4 |
| HIS112-I | Evolution of Ideas and Institutions in Early India | 4 | HIIS112-II | Ideas and Institutions in Medieval India | 4 |
| HIS113-I | Maratha Polity | 4 | HIIS113-II | Socio-Economic History of the Marathas | 4 |
| HIS123-I | Heritage Management | 4 | HIIS123-II | History of Technology in India | 4 |

**Sociology**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| SC01-I | Classical Sociological Thought | 4 | SC01-II | Sociological Theories I | 4 |
| SC02-I | Sociology of India | 4 | SC02-II | Sociology of Maharashtra: Culture and Society | 4 |
| SC03-I | Application of Sociological Research Methods | 4 | SC03-II | Methodology of Social Research | 4 |
| SC04-I | Sociology of Media | 4 | SC04-II | Globalization and Labour in India | 4 |

## SEMESTER - I

| Subject & Code | Title of the Paper | Credit |
|---|---|---|
| **Philosophy** | | |
| PHI111-I | Problems in Indian Metaphysics | 4 |
| PHI112-I | Problems in Western Metaphysics | 4 |
| PHI114-I | Early Buddhism | 4 |
| PHI115-I | Philosophy of Bhagvatgītā | 4 |
| **Education** | | |
| MAE101-I | Basics of Education | 4 |
| MAE102-I | Philosophy of Education | 4 |
| MAE103-I | Indian Education Policy & Systems | 4 |
| MAE104-I | Inclusive Education | 4 |
| **Psychology** | | |
| EP101 | Cognitive Psychology: Understanding | 4 |
| EP102 | Psychometrics: The Science of Psychological Assessment | 4 |
| EP103 | Research Methodology - I | 4 |
| EP104 | Psychology Practical: Testing | 4 |

## SEMESTER - II

| Subject & Code | Title of the Paper | Credit |
|---|---|---|
| PHII111-II | Problems in Indian Epistemology | 4 |
| PHII112-II | Problems in Western Epistemology | 4 |
| PHII114-II | Jainism | 4 |
| PHII115-II | Schools of Vedānta (I) | 4 |
| MAE101-II | Psychology of Learner & Learning | 4 |
| MAE102-II | Sociology of Education | 4 |
| MAE103-II | Research Methodology in Education | 4 |
| MAE104-II | Lifelong Learning and NGO | 4 |
| EP201 | Cognitive Psychology: Advances And Application | 4 |
| EP202 | Psychometrics: Applications | 4 |
| EP203 | Research Methodology-II | 4 |
| EP204 | Psychology Practical: Experiments | 4 |

— — —　　— — —　　— — —